# अपंगत्वावर मात करत समाजासाठी दिव्य कार्य



जाई खामकर

**कर्तृत्वासाठी अनुभवाची गरज भासते. कठोर परिश्रम केल्याशिवाय अनुभव येत नाही. छंद जोपासल्याशिवाय एखादे स्वप्न पूर्ण होत नसल्याचे पाहावयास मिळते. जीवनात अनेक संकटांना सामोरे जात दिव्यांग व दृष्टिहीन मुलांच्या शिक्षणासाठी देशात प्रथम महाविद्यालय उभे केले. याचे मोठे समाधान आहे.**

दिव्यांग व दृष्टिहीन असल्याने जीवनात नैराश्याची भावना असणे हे साहजिकच आहे. पण अंधत्व आल्याने जीवनात अशा लोकांच्या पाठीशी उभे राहण्याचे धाडस टाकळी हाजी (ता. शिरूर ) येथील जाई खामकर यांनी केले आहे. अंगात आलेल्या तापातून व उपचारातून त्यांना अंधत्व निर्माण झाले. छोटे छोटे व्यवसाय करून त्यांनी आपला प्रपंच थाटला आहे. पण अंधत्व आल्याने दुसऱ्यावर आपला भार पडू नये हीच त्यांची भावना राहिली होती.



## दिव्यांगांना व्यावसायिक मार्गदर्शन

२००२ मध्ये त्यांनी दिव्यांग व दृष्टिहीन अपंगांना एकत्रित करून त्यांना आधार देण्याचे काम केले. काही दिवस या लोकांच्या हाताला काम मिळावे यासाठी त्यांना वेगवेगळे व्यवसायाचे मार्गदर्शन केले. व्यवसाय मार्गदर्शन हा त्यांच्या कामाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. उच्च शिक्षण मिळत नसल्याने दिव्यांग व दृष्टिहीनांना कुठेही नोकरी मिळत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे या लोकांच्या मनात नेहमी नैराश्याची भावना असते. घरात त्यांना कुटुंबाचा भार म्हणून सांभाळले जातात. पुरेसे शिक्षण नसल्याने यांच्यापर्यंत शासकीय योजना पोचत नाहीत.

## महाविद्यालय उघडण्याचा मानस

उच्च शिक्षणाच्या संधीसाठी प्रयत्न या दिव्यांगांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली तर ते त्यांच्या पायावर ते उभे राहून काहीतरी करतील, असा त्यांना विश्वास होता. तेव्हापासून खामकर यांनी दिव्यांग व दृष्टिहीन मुला मुलींसाठी महाविद्यालय उघडण्याचा मानस ठेवला. मुंबईपर्यंत या कामासाठी त्यांनी धाव घेतली. या कामी त्यांना प्रशासन व अधिकारी वर्गाची मदत महत्त्वाची ठरली आहे. अखेर पुणे विद्यापीठाला प्रस्ताव सादर करून त्यांनी न्यू व्हिजन कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले. जवळपास ५१ दिव्यांग व दृष्टिहीन विद्यार्थी येथे महाविद्यालयीन शिक्षण घेऊ लागली आहेत. अंध व अपंगासाठी देशातील हे पहिले महाविद्यालय सुरू करण्यात त्यांना यश आले.

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच संगीत शिक्षण दिले जात आहे. काही संस्थादेखील त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात. प्रसन्न चेहरे आणि शिक्षण घेण्याची जिज्ञासू वृत्ती यामुळे हा परिसर फुलून गेला आहे. या कर्तृत्ववान महिलेमुळेच या मुलांच्या जीवनात आनंद भरला आहे. राज्यातून आलेले विद्यार्थी येथे महाविद्यालयीन शिक्षण घेताना दिसत आहेत. शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील जाई खामकर यांच्या कर्तृत्वामुळेच या मुलांना दिशा मिळणार आहे.

## कौशल्य विकासातून स्वावलंबन

कौशल्य विकास या माध्यमातून या मुलांना शिक्षणाबरोबर त्यांच्या पायावर उभे करावयाचे आहेत. पुढील काळात डिजिटल महाविद्यालय तयार करणार असून यासाठी सामाजिक संस्थानी मदत करणे अपेक्षित आहे, असे संस्थापिका जाई खामकर यांनी सांगितले.

सकाळ

# मळगंगा अंध अपंग संस्थेत ई-लर्निंग

**टाकळी हाजी :** टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील मळगंगा अंध अपंग सेवा संस्थेत ई-लर्निंग सुविधा सुरू करण्यात आली आहे. यासाठी के. एस. एस. कस्तुरी शिक्षण संस्थेच्या सोहनी व डॉ. प्रतिभा घाग या दांपत्याने संस्थेसाठी दोन संगणक भेट म्हणून दिले आहेत. टाकळी हाजी येथील शांताबाई मेडिकलचे संचालक राहुल सोदक यांनी एक संगणक संस्थेसाठी दिला. या वेळी सी. टी. बोरा कॉलेज शिरूरचे मराठी विभाग प्रमुख डॉ. लळीत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी विनोद कोष्टी, संस्थेच्या संस्थापिका अध्यक्ष जाई खामकर, साहेबराव लोखंडे उपस्थित होते.

Pune, District-Today
11/10/2019 Page No. 5

सकाळ

# जाई खामकर यांचा टाकळीत सन्मान

**टाकळी हाजी, ता. ९ :** ''महिला वर्ग सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत पुढचे पाऊल टाकत असून, जिद्द व संघर्षाच्या जोरावर महिला समाजाचे चित्र बदलू शकते'', असे मत पंचायत समिती सदस्या अरुणा घोडे यांनी व्यक्त केले.

टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील ग्रामस्थांनी महिला दिनाचे औचित्य साधून अंध व अपंगांसाठी काम करणाऱ्या जाई खामकर यांचा सत्कार केला. त्या वेळी त्या बोलत होत्या.



**टाकळी हाजी (ता. शिरूर) : अंध व दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या जाई खामकर यांच्या सत्कारप्रसंगी मान्यवर.**

या वेळी सरपंच दामू घोडे, माजी सरपंच बन्सी घोडे, वंदना खामकर, पोलिस पाटील शोभा मंदिलकर, अशोक गावडे, नारायण पवळे, फकिरा घोडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

खामकर म्हणाल्या, की ''तरुणपणात डोळे गमावल्याने दिव्यांगासाठी काम करण्याची जिद्द मनाशी होती. त्यातून अनेक समस्यांना सामोरे जात अंध व अंपगांसाठी महाविद्यालय तयार करण्याचे धाडस केले आहे. ग्रामस्थ व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या साथीमुळे हे शक्य झाले.''

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिदास घोडे यांनी केले.

Pune, District-Today
10/03/2019 Page No. 10

शेख, सागर शिंदे हे त्याला कुस्तीचे धडे    दिग्विजयचे अभिनंदन केले आहे.

# शिक्षण हा आयुष्याचा मुख्य पाया

## टाकळी हाजी येथे उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांचे मत



**टाकळी हाजी (ता. शिरूर) : मळगंगा अंध-अपंग संस्थेला भेट दिल्यानंतर पुण्याचे उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांचा सत्कार करताना मान्यवर.**

**टाकळी हाजी, ता. १६ :** 'शिक्षण हाच आयुष्याचा मुख्य पाया असून, पालकांनी पुढची पिढी घडविण्यासाठी मुलांना उच्चतम शिक्षण द्यावे,'' असे मत उपजिल्हाधिकारी व ई-फेरफार प्रकल्प समन्वयक रामदास जगताप यांनी व्यक्त केले.

टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील मळगंगा अंध-अपंग सेवा संस्थेच्या न्यू व्हिजन कला व वाणिज्य महाविद्यालयात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी पंचायत समितीच्या सदस्या अरुणा घोडे, अंध-अपंग संस्थेच्या अध्यक्षा जाईताई खामकर, अनिता जगताप, बाळासाहेब घोडे, पोलिस पाटील शोभा मंदिलकर, तुकाराम रासकर, बाळशिराम चोरे, एम. डी. लोखंडे, समृद्ध खेडकर उपस्थित होते.

जगताप म्हणाले, "कुटुंबातील एक व्यक्ती उच्चतम शिक्षण घेऊन अधिकारी झाली, तर ते कुटुंब शिक्षणाच्या प्रवाहात येते. एक एकर जमीन पडीक राहिली तरी चालेल; पण शेतकरी कुटुंबातील मुलांना शिक्षण दिल्याने त्यांच्यातील प्रगती वाढेल.'' सूत्रसंचालन इंदर खामकर यांनी केले. ईश्वर पवार यांनी आभार मानले.

## » माझे मत

# भूलथापांना बळी न पडता मतदानाचा हक्क बजावावा



निवडणूक ही लोकशाहीचा कणा असून, मतदान करणे हा पवित्र हक्क आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी हा हक्क प्रत्येकाने बजावावा. त्यासाठी सरकारी अथवा खासगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांना सुटी दिली जाते. निवडणूक जवळ आली की प्रशासन एक उत्सव म्हणून तयारी करते. या उत्सवात सहभागी होण्याचा हक्क मतदाराने बजावला पाहिजे. कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता आपला पवित्र हक्क बजावावा. कोणाच्या सांगण्यावरून मतदान करण्यापेक्षा स्वतःहून यात सामील व्हावे. अनेकदा मतदान करताना आमिषे दाखविली जातात. उमेदवार निवडून येण्यासाठी खोटा प्रचार केला जातो. अशा लोकांच्या भूलथापांना मतदारांनी बळी पडू नये. कराच्या रूपाने आपण आपल्या कष्टाचा पैसा देशाला देतो, त्यातून विकासकामे होत असतात. आपण निवडून दिलेला नेता हा जनसेवक असेल तर आपल्या पैशातून आपला विकास होऊ शकतो. असा जनसेवक निवडून देण्याची संधी गमावू नये. युवा वर्ग संगणकीय क्षेत्रात अग्रेसर झाल्याने त्याच्या मताची किंमत त्याला समजली आहे. योग्य उमेदवाराला निवडून देण्यासाठी त्याचे प्रयत्न महत्त्वाचे ठरणारे आहेत. प्रचारादरम्यान कोणी काय आमिषे, आश्वासने दिली हे विसरून जावे. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला जागृत ठेवून मतदान करा, त्यात आपले आणि राज्याचे हित आहे.

**-जाई खामकर**, संस्थापक अध्यक्ष,
मळगंगा अंध अपंग संस्था, टाकळी हाजी (ता. शिरूर)

(अशाच आशयाचे पत्र सोनाली खरपुडे (संचालिका, अभिनव स्वस्त जेनेरिक औषधी सेवा, जुन्नर) यांनीही पाठविले आहे.)

सकाळ

# 'दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी समाजाने पुढाकार घ्यावा'

**टाकळी हाजी, ता. ३ :** "समाजात मोठ्या प्रमाणात दिव्यांग व दृष्टिहीन वर्ग आहे. त्यांच्याबद्दल आपुलकी व स्नेहबंधनाचा भाव असणे आवश्यक आहे. त्यांच्या समस्या व प्रश्न मार्गी लावण्यासाठी समाजाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत निवृत्त विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केले."

टाकळी हाजी (ता. शिरूर) येथे मळगंगा अंध अपंग सेवा संस्थेच्या न्यू व्हिजन कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक दिव्यांग प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिरामण चौधरी होते.



**टाकळी हाजी (ता. शिरूर) : रोपाचे पूजन करताना सीमा पाटोले.**

या वेळी पुढे बोलताना दळवी म्हणाले, "देशात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था असणाऱ्या शिक्षण सम्राटांना दिव्यांग व दृष्टिहीन विद्यार्थ्यांविषयी आस्था निर्माण झाली नाही. पण सर्वसाधारण कुटुंबातील दृष्टिहीन असणाऱ्या जाई खामकरसारखी महिला देशात महाविद्यालय सुरू करते ही गौरवास्पद आहे." दरम्यान, या वेळी अमरावती येथील दृष्टिहीन विद्यार्थिनी सीमा पाटोले हिच्या हस्ते वृक्षाचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

या प्रसंगी सुनीता गावडे, जाई खामकर, अरुणा घोडे, तुकाराम रासकर, स्वप्नील घुले, बाळशिराम चोरे, शोभा मंदिलकर, वंदना खामकर, बन्सी घोडे, सुदाम गायकवाड, पद्माकर गोरे, मैत्री सेवा संघाचे विद्यार्थी आदी उपस्थित होते.

Pune, District-Today
04/12/2019 Page No. 4

# तिने डोळसपणे पाहिलं अन् साकारलं एक दिव्य स्वप्न

## दिव्यांगांसाठी महाविद्यालयाचा देशातील पहिलाच उपक्रम; जाई खामकर यांची जिद्द व संघर्षाची प्रेरणादायी कहाणी

» विधायक

**संतोष शाळिग्राम** :
सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ७** : डोळस माणसाची दृष्टी थिटी पडेल, असं दिव्यस्वप्न एका दृष्टिहीन महिलेनं पाहिलं. त्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. डोळस जगानंच उभे केलेले अडसर वाटेत आले; पण त्यांना धक्के देत, ते पार करीत ती चालत राहिली... दिव्यांगांना उच्च शिक्षण मिळालं पाहिजे, असं तिचं स्वप्न होतं; ते आता साकारू पाहत आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून दिव्यांगांसाठी देशातील पहिलं वरिष्ठ महाविद्यालय ती सुरू करीत आहे.

जाई खामकर हे त्या कर्तबगार महिलेचं नाव. शिरूर तालुक्यातील टाकळी हाजीमध्ये हे महाविद्यालय सुरू होतंय. त्यांचा संघर्ष थक्क करणारा आहे. पण, दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आशावाद असेल, तर परिस्थितीच तुमच्यासमोर हात जोडून उभी राहते, याचाही प्रत्यय येतो. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत सारं काही ठीक सुरू होतं. पण, कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण सुरू असताना क्षणात सारं बदलून गेलं.

औषधाची रिॲक्शन आल्याचं निमित्त झालं. त्यांचं शरीर लुळं पडलं, दृष्टी गेली. अंधपणाचं दु:ख बरोबर घेऊन त्या उभ्या राहिल्या, घराबाहेर पडल्या. सुरवातीला त्यांनी एसटीडी बूथचा व्यवसाय सुरू केला. त्यातून दिव्यांगाशी संपर्क येऊ लागला. आता सर्वांसाठी काहीतरी केलं पाहिजे, असा निश्चय त्यांनी केला. मळगंगा अपंग संस्था सुरू करून परिसरातील अडीचशे दिव्यांगांना एकत्र आणलं.

औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांची मदत घेऊन, त्यांना काम मिळवून दिलं खरं; पण त्यांना उच्च शिक्षण मिळत नाही, याची खंत मनात होती. म्हणून त्यांनी पुण्यात ५२ दिव्यांग मुलींना विविध महाविद्यालयांत प्रवेश मिळवून दिला. पण, प्रत्येक ठिकाणी वसतिगृह मिळणार नाही, असं सांगण्यात आलं. या नकारामुळे त्यांनी वसतिगृहासह महाविद्यालय

पान १२ वर »

### संगणकावर शिक्षण

दृष्टिहीनांसाठी उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम नव्हता. तो जाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ऑडिओ स्वरूपात तयार केला आहे. कला आणि वाणिज्य या शाखांचे शिक्षण महाविद्यालयात संगणकाद्वारे दिले जाणार आहे. दृष्टिहीन विद्यार्थ्यांना ऐकून आणि दिव्यांगांना स्क्रीनवर दाखवून शिकविले जाणार आहे. महाविद्यालयात ८० टक्के विद्यार्थी हे दृष्टिहीन आणि दिव्यांग असतील, तर २० टक्के विद्यार्थी सर्वसाधारण असतील.






टाकळी हाजी (ता. शिरूर) : दृष्टिहीन व दिव्यांग विद्यार्थ्यांनी हिवाळी शिबिरानिमित्त काढलेली जनजागृती फेरी.

# दृष्टिहीन, दिव्यांग विद्यार्थ्यांचे टाकळी हाजीत हिवाळी शिबिर

**टाकळी हाजी, ता. १ :** 'झाडे लावा, झाडे जगावा', 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'एकमेकांना हात द्या, दिव्यांगाना साथ द्या', 'आम्ही नाही परावलंबी, आम्ही तर स्वावलंबी' अशा घोषणा देत टाकळी हाजी (ता. शिरूर) येथे अंध व अपंग संस्थेच्या न्यू व्हिजन कला व वाणिज्य विद्यालयातील दृष्टिहीन व दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली.

टाकळी हाजी येथे दृष्टिहीन व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पुणे विद्यापीठाने पहिल्यांदाच राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत हिवाळी शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांनी गावातून जनजागृती फेरी काढली. कुंड पर्यटन स्थळ रांजणखळगे येथे हे शिबिर झाले. पाच दिवसांच्या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. बी. के. भोसले, माजी सरपंच बन्सी घोडे, रोहिदास घोडे, संस्थापिका जाई खामकर, प्राचार्य तुकाराम रासकर, स्वागत निघोट, बाळासाहेब इंगळे, संध्या किठे, संतोष लोंढे, वंदना खामकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते. आरोग्यविषयक शिबिर, श्री मळगंगा देवी परिसर स्वच्छता, प्रा. प्रतिभा घाग यांचे व्याख्यान आदी उपक्रम राबविण्यात आले. दृष्टिहीन व दिव्यांग विद्यार्थ्यांचे हे शिबिर, असल्याने परिसरातून कौतुक झाले.

**विद्यापीठाने यापूर्वी दृष्टिहीन व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी हिवाळी शिबिर आयोजित केले नव्हते. या शिबिरात भाग घेऊन विविध उपक्रम राबविता येत, असल्याने खूप समाधानी आहोत.**

**– योगेश अभोरे,** दिव्यांग विद्यार्थी

**एकमेकांना साद घालत श्री मळगंगा देवीच्या मंदिर परीसराची स्वच्छता केली. मंदिरातील घंटा व नगारा यांचा जवळून आनंद घेतला. जनजागृतीच्या घोषणा दिल्या. झुलता पूल व निसर्गनवल रांजणखळग्यांचा स्पर्श करून घेतलेला अनुभव अविस्मणीय ठरला.**

**– प्रिया पवार,** दिव्यांग विद्यार्थिनी

भारतीय जन संविधान मंच
BJSM

ऊर्जा फाऊंडेशन
माझी ऊर्जा । माझी ताकद

Maharashtra Information Technology Support Center
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
MITSC

# चांगुलपणाची चळवळ आयोजित

# दृष्टीपल्याडची सृष्टी...!





**डॉ.ज्ञानेश्वर मुळे**
**सदस्य**
**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग**

**मा. जाई खामकर**
**अध्यक्ष**
**मळगंगा अंध अपंग सेवा संस्था**

## मुलाखत

YouTube LIVE

**12 Sept 2020 सायंकाळी 5.00 वाजता**

117